महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महापारेषण समाचार

वर्ष-९ अंक-४ जुन -जुलै -२०१५

प्रिय, अधिकारी / कर्मचारी बंधू आणि भगीनींनो,

पावसाच्या मौसमात आपली पारेषण यंत्रणा अबाधीत राहील याची खबरदारी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात अविरत कार्य करणारा माझा अभियंता /कर्मचारी वर्ग घेत असेल ह्याबद्दल मला शंका नाही. डोंगरदऱ्या मधून गेलेली वाहिनी आपल्या सततच्या सुव्यवस्थेमुळे वीज वहनात कोठेही अडसर निर्माण करत नाही. मात्र निसर्ग मनुष्यापुढे अनेक आव्हाने निर्माण करू शकतो. अशा परिस्थितीत आपल्याला संपुर्ण कार्यकुशलतेने झालेली हानि कमी वेळात आणि कमी खर्चात काढून व्यवस्था पुर्वपदावर आणावी लागते.

विजेला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळेच आधुनिक युगात विजेला आपण 'ऊर्जा" (Energy) असे संबोधतो. ज्यामुळे मानवाच्या क्रियाशक्तीवर अमुलाग्र प्रभाव पडू शकतो. मानवजिवन विजे शिवाय काही अंशी ठप्प होते याची उदाहरणे काही वेळा भूतकाळात दिसून आलेली आहेत.

२६ जुलै २००५ मुंबईचा महाप्रलय निसर्गापुढे मानवाने तांत्रिकी व विज्ञानात कितीही प्रगती केली, परंतु निसर्ग किती आव्हाने उभी करू शकतो याची आपल्याला प्रचिती आली. महाप्रलयात कोलमडून गेलेली वीज यंत्रणा व्यवस्थीत पुर्वपदावर आणण्यास मोठ्या प्रमाणावर शिकस्त करावी लागली.

वीज प्राथमिक गरज असल्याने Disaster Management करताना तसेच राहत व बचाव कार्य करताना विजेची अत्यंत गरज असते. नैसर्गिक व मानवनिर्मीत अश्या दोन्ही प्रकारच्या आपत्यांना Infrastructure सेवा देणाऱ्यांना सामोरे जावे लागते. मानवनिर्मीत आपत्ती आपल्या चांगल्या प्रकारच्या नियोजन, देखभाल, खबरदारी व सुव्यवस्था सारख्या निकषावर आटोक्यात राखण्यात मदत होते. तसेच नैसर्गिक आपत्तीची ही क्षती मोठ्या प्रमाणात कमी ठेवण्यास मदत करते मात्र त्या करीता ह्या निकषावर उत्तम दर्जाची कामगिरी करता आली पाहिजे.

Regular / Break-down / Predictive Maintenance आपली यंत्रणा भक्कम ठेवून त्याची Life वाढण्यास मोलाची कामगिरी बजावतात. Patrolling, Monkey Patrolling, Thermo-Vision Scanning, Hot-spot Detection, Tree Cutting ह्या बाबी आपल्या दैनंदिन कार्याचा भाग बनल्या पाहिजे. हे संपुर्ण Infrastructure आपलं अपत्य असून त्याची सुस्थिती अबाधीत राखण्याची व त्याची कार्यक्षमता वाढवण्याची आपण काळजी घेतली पाहिजे. Ownership, Accountability, Trust, Co-operation, Co-ordination ह्या बाबी Field level ला फार मोठी भूमीका बजावतात कारण कामगिरी बजावताना आपल्याला अनेक विभागांशी संलग्न व्हावे लागते. एक Team म्हणून आपण जेव्हा कार्य करतो तेव्हा आपण ऐकमेकांच्या



**राजीव कुमार मित्तल**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

मदतीला उभे ठाकतो व ऐकमेकांबरोबर चुरस करण्यास स्थान मिळत नाही. Testing, Construction, Civil, O&M व Projects Team जेव्हा ऐकमेकांना समजून घेवून एकसंघ होवून Field मध्ये कार्य बजावतात तेव्हा सुंदर कार्याचे प्रमाण मिळते. त्याउलट आपली क्रियाशक्ती ऐकमेकांवर आरोप प्रत्यारोप करण्यात खर्च होते.

चला आपण स्वत:शी स्पर्धा करूया आणि आपली गुणवत्ता आणखी पुढच्या पातळीवर घेवून जावूया.

**राजीव कुमार मित्तल**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

## USAID च्या प्रतिनिधी मंडळाची राज्य भार प्रेषण केंद्राला भेट व मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांसोबत बैठक






USAID (United States Agency for International Development) च्या प्रतिनिधी मंडळाने दिनांक २३/७/२०१५ रोजी महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राला भेट देऊन USAID च्या अंतर्गत अपारंपारिक ऊर्जा स्त्रोत राज्य पारेषण प्रणालीमध्ये संलग्न करून घेण्याबद्दल अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक महापारेषण व अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली.

महाराष्ट्र शासनाने नवीन व नवीकरण ऊर्जा स्त्रोत (अपारंपारिक ऊर्जा) या पासून वीज निर्मितीच्या पारेषण संलग्न प्रकल्पांसाठी एकत्रित धोरण २०१५ जाहीर केले आहे. या धोरणाच्या अंतर्गत ५००० मे. वॅ. पवन उर्जा निर्मिती व ७५०० मे. वॅ. सौर ऊर्जा निर्मितीचे महत्वाकांक्षी उद्दीष्ट निश्चित केले आहे. या धोरणाच्या अनुषंगाने मोठ्या प्रमाणावर पवन ऊर्जा पारेषण प्रणालीत समाविष्ट करण्यासाठी आवश्यक ते नियोजन कसे करता येईल या बाबत पथदर्शी आराखडा तयार करणे हे सदर भेटीचे प्रयोजन होते.

या भेटीचे दरम्यान USAID च्या श्रीमती सराह ब्लॅनफोर्ड, डॉ.प्रिया श्रीधरन व श्रीमती मोनाली हजरा उपस्थित होत्या. महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव मित्तल, यांनी प्रतिनिधी मंडळाचे स्वागत केले.

या प्रसंगी प्रतिनिधी मंडळाची, मा. श्री. राजीव मित्तल, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण व भार प्रेषण केंद्राचे अधिकारी वर्ग यांच्यासह बैठक झाली. सदर बैठकीत राज्य भार प्रेषण केंद्राद्वारे अपारंपारिक ऊर्जा निर्मिती बाबत सद्य स्थितीचे सविस्तर सादरीकरण केले. USAID च्या प्रतिनिधी मंडळाने अपारंपारिक ऊर्जा व्यवस्थापनासाठी, भविष्यातील आव्हानांना सामोर जाण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रणाली व उपाय योजनांबाबत सादरीकरण केले.

या सादरीकरणा अंतर्गत अपांरपारिक ऊर्जा स्त्रोताचे पारेषण संलग्न करण्याबाबत पथदर्शी प्रकल्पाचे नियोजन, आराखडा अंमलबजावणी व संचलन या बाबत सविस्तर विश्लेषण केले आणि पारेषण प्रणालीची उभारणी या बाबत उहापोह करण्यात आला. सदर प्रकल्पाच्या यशस्वीतेसाठी इतर प्रगत देशातील प्रणालीबाबत माहिती व ज्ञानाची देवाणघेवाण (Knowledge Sharing )या बाबत चर्चा झाली.

सदर प्रसंगी राज्य भार प्रेषण केंद्राचे मुख्य अभियंता, डॉ. संजय कुलकर्णी व श्री. वसंत पांडे, श्री. जयंत बनसोड, श्री. अनिल रेवागड व श्री. दिपक कोल्हे यांनी चर्चेत भाग घेतला.

## *महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती/निवृत्ती माहे जुन ते जुलै २०१५*

| नियुक्ती- | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **नाव** | **पद** | **पद स्थापनेचे ठिकाण** | **दिनांक** |
| १. | श्री. शशिकांत मधुकर बाकरे | अधीक्षक अभियंता (मासं-प्रशिक्षण) | सांघिक कार्यालय, मुंबई | ०८.०६.२०१५ |
| २. | श्री. राजु गंगाधर गायकवाड | उप महाव्यवस्थापक (मासं-तां) | सांघिक कार्यालय, मुंबई | ०१.०६.२०१५ |
| **निवृत्ती-** | | | | |
| **अ.क्र.** | **नाव** | **पद** | **पद स्थापनेचे ठिकाण** | **दिनांक** |
| | निरंक | - | - | - |
| | | | | |

## ४०० के.व्ही. ग्र.कें. संवसु विभाग, खारघर येथे ३१५ एम.व्ही.ए.चा रोहित क्र.३ कार्यान्वित

४०० के.व्ही. ग्र. के.संवसु विभाग, खारघर येथे नव्याने उभारण्यात आलेले ३१५ एम.व्ही.ए. ४००/२२०/३३ के.व्ही. क्षमतेचे रोहित्र दि.२९.०६.२०१५ रोजी सकाळी ०९.३६ वाजता मा. श्री. राजीव कुमार मित्तल, अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण कंपनी यांच्या शुभ हस्ते कार्यान्वित करण्यात आले. या प्रसंगी मुख्य अभियंता वाशी परिमंडळ, मा. श्री. संजय शिंदे, अधीक्षक अभियंता सर्वश्री, चंद्रकांत भोसले, सतिश गहेरवार, सुनिल सुर्यवंशी, महेंद्र वाळके, भुषण बल्लाळ, तसेच कार्यकारी अभियंता, सर्वश्री प्रफुल पालकर, राम कोल्हे, संजय बनसोड,



प्रकाश लिमकर तसेच खारघर ४०० के. व्ही. ग्र. कें. विभागाचे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. दादासाहेब दाईगडे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांनी केले.

सदर ३१५ एम.व्ही.ए. रोहित्र दिलेल्या वेळेत कार्यान्वित करण्याकरीता ४०० के.व्ही.ग्र.कें. संवसु विभाग खारघर येथील अधिकारी / कर्मचारी वर्गाने अहोरात्र तसेच भर पावसात अथक परिश्रम घेतले.

सदर रोहित्र कार्यन्वित झाल्याने ४०० के.व्ही खारघर ग्रहण केंद्राची उपलब्धता वाढली असून त्यामुळे मुंबई परिसर क्षेत्राची विजेची वाढीव मागणी अखंडीतपणे पुरविणे शक्य होणार आहे.

## अति उच्च दाबाची १३२ के.व्ही. चाकूर-अहमदपूर विद्युत वाहिनी चे काम पुर्ण





महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित तर्फे औरंगाबाद परिमंडळा अतंर्गत येणाऱ्या लातूर उप विभागा अंतर्गत चाकूर ते अहमदपूर या २१.३७२ कि.मी. लांबीच्या अति उच्च दाबाची १३२ के. व्हि. एकदल वाहिनीचे तारा ओढण्याचे काम पूर्ण झाले असून या वाहिनीतील विद्युत प्रवाह दि. ३१.०७.२०१५ रोजी किंवा त्यानंतर कोणत्याही दिवशी सुरू करण्यास उपलब्ध आहे. ही विद्युत वाहिनी लातूर जिल्हातील चाकूर तालुक्यातील चाकूर, अलगरवाडी, (होनाळी शिवार), शंकरवाडी, चापोली, मुरकी उमरगा, तेलगाव, व अहमदपूर तालुक्यातील मेथी, लिंगदाळ, नांदूरा (बु), नांदूरा (ख), हाळणी, अहमदपूर या गावाच्या शिवारातून जाते. या विद्युत वाहिनीमुळे मागील काही काळापासून अहमदपूर व चाकूर परिसरातील जनतेस कमी दाबाचा व वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण कमी होवून असे प्रकार पुढील काळात या वाहिनीमुळे थांबतील. या अगोदर ऐन दसरा सणाच्या मुहुर्तावर अशी ऐकेरी असणारी विद्युत वाहिनीत बिघाड झाल्यामुळे अहमदपूर परिसरातील लोकांना तीन दिवस अंधारात काढावे लागले होते. या सर्व बाबींचा आढावा घेवून महापारेषण तर्फे नवीन वाहिनीची उभारणी करण्याचे कार्य युद्धपातळीवर हाती घेण्यात आले होते. अनेक अडचणीवर मात करून लातूर विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वाहिनी चे काम पूर्णत्वास नेले.

## महापारेषण कंपनीच्या १० व्या वर्धापन दिनानिमित्त विविध सामाजिक उपक्रम व उत्कृष्ठ उपकेंद्राना परिमंडळ स्तरीय २०१३ -१४ करीता पुरस्कार वितरण





दि. ०६ जून २०१५ रोजी महापारेषण कंपनीच्या १० व्या वर्धापन दिनानिमित्त वाशी परिमंडळातर्फे उदादिधा ग्र. कें. संवसु मंडळ, पडघे येथे सांस्कृतिक भवनात वर्ष -२०१३-१४ मध्ये उत्कृष्ठ कामगिरी बजावलेल्या उपकेंद्रांना पुरस्कार प्रदान सोहळा संपन्न झाला. वर्धापन दिनानिमित्त फोर्टिस हॉस्पिटल, मुलुंड यांच्या सहकार्याने कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांसाठी मोफत वैद्यकीय तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. त्याचा लाभ १०० जणांनी घेतला. तसेच लोकमान्य टिसा रक्तपेढी, ठाणे यांचे सहकार्याने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. त्यात ३५ जणांनी रक्तदान केले. वैद्यकीय तपासणी शिबीराचे उद्घाटन श्री. संजय शिंदे, मुख्य अभियंता, वाशी परिमंडळ यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

वर्ष -२०१३-१४ साठी वाशी परिमंडळ स्तरावर बक्षीस पात्र ठरलेल्या उपकेंद्र / विभागांना पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले.

श्रीमती कांचन किटुकले अउदा संवसु मंडळ, कळवा यानी स्वलिखीत कवितांचे सादरीकरण केले.

त्याच प्रमाणे सह्याद्री हॉस्पिटल, नेरूळ यांच्या सौजन्याने सर्व अधीक्षक अभियंता यांना प्रातिनिधीक स्वरुपात प्रथमोपचार पेटीचे वाटप करण्यात आले. त्यांचे वतीने अउदा संवसु मंडळ, पनवेल कार्यालया अंतर्गतचे सर्व उपकेंद्रांना प्रथमोपचार पेटीचे वाटप करण्यात येणार आहे. दुपारी ३.०० वाजता डॉ. मंजित सिंह, फोर्टीस हॉस्पिटल, मुलुंड यांनी मराठीत उपस्थितांना अपघात प्रसंगी तातडीने करावयाचे प्रथमोपचाराबद्दल प्रात्यक्षीक दाखविले. त्यामध्ये श्रीमती नयना डोये, श्रीमती कांचन किटुकले, श्री. ठाकुर, श्री. एम. ए. खान, श्री. निशांत घरत, कु. स्वाती क्षीरसागर यांनी सक्रिय सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. पी. जे. कुलकर्णी, वरिष्ठ व्यवस्थापक (मासं) यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रीमती विभावरी बाविसकर -सावंत यांनी केले. तसेच, वाशी परिमंडळातील सर्व कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. पुरस्कारार्थींच्या वतीने सर्वश्री सावंत, श्रीकांत पेटकर, चंद्रशेखर खराबे, राजेश दखणे आदिंनी बक्षीस पात्र ठरण्यासाठी त्यांनी काय प्रयत्न केले यासंबंधी इतरांना प्रेरणादायी माहिती दिली. तसेच, सर्वश्री सतिश गहेरवार, रविंद्र सातपुते, महेंद्र वाळके, भुषण बल्लाळ आदि अधीक्षक अभियंता यांनी, मार्गदर्शनपर प्रबोधन केले. श्री. संजय शिंदे, मुख्य अभियंता, वाशी परिमंडळ यांनी पुरस्कारार्थी तसेच उपस्थितांना मार्गदर्शन केले.





## महापारेषण कंपनीमध्ये नव्याने रुजू झालेल्या नुतन अभियंत्यांच्या प्रशिक्षण वर्गास सुरवात

महापारेषण कंपनीमध्ये नव्याने रुजु झालेल्या अभियंत्यांच्या प्रशिक्षण वर्गास तळंदगे येथे सुरवात झाली. ६ व्या प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन मुख्य कार्यालयाचे अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण), श्री. बाकरे यांच्या हस्ते दि. ६ जुलै २०१५ रोजी दीप प्रज्वलनाने करण्यात आले. हे प्रशिक्षण वर्ग २४ ऑगस्ट २०१५ पर्यंत चालेल. या कार्यक्रमासाठी श्री. संदीप हाके, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) कोल्हापूर यांनी प्रास्ताविक व तळंदगे प्रशिक्षण केंद्राचा २०१० पासूनच्या कामाचा आढावा सादर केला. आयआयटी रुरकी व इतर नामांकित महाविद्यालयातून पदव्युत्तर शिक्षण घेवून एम.टेक व एम.ई. झालेले बहुतांश अभियंते या प्रशिक्षण वर्गामध्ये सहभागी झाले आहेत.

यावेळी श्री. बाकरे यांनी प्रशिक्षणाचे महत्व याविषयी प्रशिक्षणार्थीना मार्गदर्शन केले. प्रशिक्षणार्थीनी प्रातिनिधीक स्वरुपात आपल्या मनोगतामध्ये केंद्रामधील सोईसुविधाबद्दल समाधान व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी कार्यकारी अभियंता श्री. शेळके, श्री. चौगुले व श्री. धमाले तसेच कराड परिमंडळाचे सहा. महाव्यस्थापक (मा.सं.), श्री. कांबळे उपस्थित होते. यावेळी सर्व नुतन अभियंत्याना गुलाब पुष्प देवून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. सर्व प्रशिक्षणार्थीनी या कालावधीमध्ये मन लावून प्रशिक्षण पुर्ण करु अशी ग्वाही दिली.






## MAHATRANSCO PRESENCE AT GRIDTECH-2015

5th International Exhibition and Conference GRIDTECH - 2015 organized by POWERGRID with support of Ministry of Power - Govt. of India was held at Pragati Maidan New Delhi, in April-2015. This was inaugurated by Shri Piyush Goyal, Hon'ble Minister of State with Independent Charge for Power, Coal and New & Renewable Energy in the Government of India. Shri Gireesh Pradhan, Chairman-CERC honoured this event as a Chief Guest at valedictory session of GRIDTECH – 2015.




Shri Amit Kulkarni, sharing MAHATRANSCO experience on implementing WAMS Technology at 5th International Exhibition and Conference GRIDTECH - 2015 at Pragati Maidan - New Delhi, in April-2015

MAHATRANSCO has shared its experience of implementing SMARTGRID Technology in Transmission comprising of Wide Area Measurement Systems (WAMS) in MSETCL for grid Operation and Monitoring. A paper authored by Amit R. Kulkarni, Shrikant S. Rajurkar Subhash G. Kelkar and M.S.Ballal titled "Towards Smarter Transmission Grid: MAHATRANSCO Experience" was presented by Amit R. Kulkarni at this prestigious conference under the category "Emerging Trends in Smart Grid", which was well appreciated by various dignitaries from Industry and Academics. The Eight other papers presented under this category included papers from ALSTOMGRID-UK, Papers from ERDF & ADEME-France, POSOCO, Central Power Research Institute (CPRI)-Bangalore and Electricity Department-Puducherry and POWERGRID.

## कु. मधुरा हिची शांलात परिक्षेत उत्तुंग भरारी



महापारेषण कंपनीच्या भारप्रेषण केंद्र अंबाझरी येथे कार्यरत अतिरिक्त कार्यकारी अभियंता, श्री. मोहन कुथे यांची मुलगी कु. मधुरा हीने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या मार्च २०१४ -१५ च्या दहावी परिक्षेत ९८.४ टक्के गुण प्राप्त करून उत्तुंग यश प्राप्त केले आहे. विज्ञान आणि संस्कृत या विषयात प्रत्येकी १०० गुण मिळाले असून नागपूर मंडळामध्ये संयुक्तपणे तृतीय स्थान प्राप्त केले आहे. पुढे संगणक विज्ञान शाखेत अभियंता होण्याचे तीचे स्वप्न आहे,

तिच्या ऊत्तुंग यशाबद्दल महापारेषण कंपनीतर्फे तिचे हार्दीक अभिनंदन आणि पुढील यशस्वी वाटचालीकरीता शुभेच्छा.

## चि. मोनीश याचे माध्यमिक शालांत परिक्षेत गरुड भरारी



महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी मर्यादित, सांधिक कार्यालय प्रकाशगंगा, मुंबई येथे कार्यरत असणारे श्री. अरुण घोटकर, उपव्यवस्थापक (मासं) यांचा चिरंजीव मोनीश अरुण घोटकर ह्याने मार्च २०१५ च्या माध्यमिक शालांत परिक्षेत इ.१०वी मध्ये ९३.५० टक्के गुण मिळवूण यश संपादन केले. त्याच्या पुढील वाटचालीसाठी महापारेषण परिवारातर्फे शुभेच्छा

## चि. आशुतोष याचे क्रीडा व माध्यमिक शालांत परिक्षेत विशेष प्राविण्य



अऊदा स्था. बां. व सु उपविभाग लातूर येथे कार्यरत,अति. कार्यकारी अभियंता (स्था) श्री.अशोक केशवराव चव्हाण यांचा पाल्य चि. आशुतोष याने राष्ट्रीय व राज्यस्ततरीय क्रीडा स्पर्धेत थांग-ता मार्शल आर्ट, या क्रीडा प्रकारात प्राविण्य मिळवण्याबरोबरच इ.१० वी त ८४.२० टक्के गुण मिळवलेले आहेत.

क्रिडा संवर्गातून राष्ट्रीय खेळाडू म्हणून शाहू महाविध्यालय, लातूर येथे ११ वी विज्ञान वर्गात अनुदानित तुकडीत निवड होऊन प्रवेश घेतला आहे. अभियांत्रिकी पदवी मिळवून भारतीय सैन्य / पोलिसदलात जाण्यास इच्छुक असल्याचे त्याने सांगितले. चि. आशुतोष याचे महापारेषण परिवारा तर्फे हार्दिक अभिनंदन.

## कु. वैष्णवी हिचे माध्यमिक शालांत परिक्षेतील घवघवीत यश



कु. वैष्णवी संजय देशमुख हीने माध्यमिक शालांत परिक्षेत (इ. १० वी) इंग्रजी माध्यमातून ९५.२० टक्के गुण प्राप्त केले. सदर परिक्षेत तिने गणित विषयात १०० पैकी १०० गुण प्राप्त केलेले आहेत. कु. वैष्णवी ही श्री. संजय फकिरराव देशमुख, अति. कार्यकारी अभियंता, अउदा वाहिनी बांधकाम उपविभाग, मराविपारेषण कं. मर्या. भुसावळ यांची कन्या आहे. या यशाबद्दल महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी तर्फे तिचे कौतुक करण्यात येत आहे.

## कु. अपर्णा हिचे माध्यमिक शालांत परिक्षेतील अतुल्य यश



कु. अपर्णा सुरेशगीर गोसावी हिने माध्यमिक शालांत परिक्षेत (इ. १० वी)इंग्रजी माध्यमातुन ९३.४० टक्के गुण प्राप्त केले. कु. अपर्णा ही श्री. सुरेशगीर रमनगीर गोसावी, उप. कार्यकारी अभियंता, २२० के.व्ही. वदखळ उपकेंद्र अउदा संवसु विभाग पनवेल रायगड, मराविपारेषण कं. मर्या. यांची कन्या आहे. या यशाबद्दल महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी तर्फे तिचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## चि. प्रणय याचे माध्यमिक शालांत परिक्षेत सुयश



अउदा बांधकाम नि संवसु परिमंडळ अमरावती येथे कार्यरत असलेल टंकलेखक श्री. डि. टी.चोपकर, यांचा मुलगा चि. प्रणय दिनेश चोपकर ह्याने मार्च २०१४-२०१५ या सत्रात झालेली अमरावती विभाग माध्यमिक शालांत परीक्षा ९०.४० टक्के मार्क मिळवून उतीर्ण झाल्या बद्दल त्याचे हार्दिक अभिनंदन.

## चि. संकेतचे इयत्ता १० वी माध्यमिक शालांत परिक्षेत सुयश



महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित प्रमुख भांडार 'क', बारामती येथील कार्यरत असणारे श्री. प्रसन्न धर्मा भगत निम्नस्तर लिपीक (मासं) यांचा चिरंजीव चि. संकेत प्रसन्न भगत ह्याने मार्च २०१५ च्या माध्यमिक शालांत परिक्षेत इ.१० वी मध्ये ८२ टक्के गुण मिळवुन यश संपादन केल आहे. या यशा बद्दल चि. संकेतचे महापारेषण तर्फे हार्दिक अभिनंदन.

## ४० व्या अखिल भारतीय विद्युत क्रिडा नियंत्रण मंडळाच्या कबड्डी स्पर्धेचा वृत्तांत



४० व्या अखिल भारतीय विद्युत क्रिडा नियंत्रण मंडळाच्या वतीने महावितरण कंपनीने कोल्हापूर येथे आयोजित केलेल्या कबड्डी स्पर्धेत महापारेषण कंपनीच्या कबड्डी संघाने सहभाग नोंदविला होता. दि. ०८.०७.२०१५ते ११.०७.२०१५ या कालावधीत कोल्हापूर येथील "मुस्कान लॉनच्या" मैदानात महावितरण कंपनीने सदर स्पर्धेचे आयोजन केले होते.

दि. ०८.०७.२०१५ रोजी स्पर्धेचा उद्घाटन समारंभ प्रमुख पाहुणे माननीय श्री. देवेंद्र शिंदे, कुलगुरू शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर तसेच प्रमुख अतिथी श्री. निलेश घटणे, कार्यकारी संचालक (मा. सं.) महावितरण यांच्या हस्ते पार पडला व थोड्याच वेळात स्पर्धेला सुरवात झाली. सदरची स्पर्धा ही साखळी पद्धतीने खेळविण्यात आल्यामुळे महापारेषण संघास एकूण चार सामने खेळावे लागले. त्यामध्ये महानिर्मीती व आंध्रप्रदेश बरोबर खेळलेल्या सामन्यांमध्ये महापारेषण संघाने विजय संपादीत केला. सामन्यांमध्ये पात्र होण्यासाठी कमीतकमी तीन सामने जिंकणे आवश्यक होते. महापारेषण संघाचा चौथा सामना दिल्ली (बी. एस. ई. एस.) संघाशी खेळविला गेला. त्यामध्ये महापारेषण संघ १०/३० अशा गुणसंख्येने पराभूत झाला व महापारेषण संघाचे सदरहू स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले. दिल्ली (बी. एस. ई. एस.) संघाने स्पर्धेत तिसऱ्या क्रमांकाचे बक्षीस मिळविले.

महापारेषणच्या कबड्डी संघातील सर्वश्री. कृष्ण डोये - नागपूर झोन, आशिष कोकटे -पुणे झोन, प्रशांत देसाई -कराड झोन, सचिन गुणाल - औरंगाबाद झोन, या खेळाडुंनी स्पर्धेत भरीव कामगिरी केली. यामुळे महापारेषण संघाला एकूण चारपैकी दोन सामने जिंकणे शक्य झाले.

या स्पर्धेत पंजाब विद्युत मंडळाच्या संघास प्रथम क्रमांक, तर कर्नाटक वीज कंपनीच्या संघास द्वितीय व दिल्ली (बी. एस. ई. एस.) संघास तृतीय क्रमांकाचे बक्षीस मिळविण्यात यश आले.

## कु. श्रृती हिची माध्यमिक शालांत परिक्षेत गगन भरारी



अउदा संवसु मंडळ, कोल्हापूर येथे काम करणारे श्री. विजय कृष्णा अकोळकर, निम्नस्तर लिपीक यांची मुलगी कु. श्रृती ने इयत्ता १० वी च्या मार्च - २०१५ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेतमध्ये ९०.८०% गुण मिळवले आहेत व गणितामध्ये १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत.

कु. श्रृतीच्या यशाबद्दल विभागीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी श्री. अकोळकर यांच्या बरोबर कु. श्रृतीचे अभिनंदन केले.

## चि. सर्वेश याचे १२वी परिक्षेत सुयश



चि. सर्वेश उदय येवले याने मार्च २०१५ ह्या शैक्षणिक वर्षात महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी घेतलेल्या १२ वीच्या शालांत परिक्षेत ८९.०८ टक्के गुण संपादन केलेले आहेत. चि.सर्वेश येवले हा श्री उदय भालचंद्र येवले, अतिरीक्त कार्यकारी अभियंता, अउदा बांधकाम मंडळ नाशिक यांचा सुपुत्र आहे. त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## डॉ. नितीन यांची पशुधन विकास अधिकारी पदी नियुक्ती



अति. उच्च दाब (संवसु) विभाग बीड येथे उपव्यवस्थापक (मांस) या पदावर कार्यरत असलेले श्री. एच. वाय. अडबलवार यांचा पाल्य डॉ. नितीन अडबलवार हे महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मार्फत एप्रिल २०१४ मध्ये घेण्यात आलेल्या सरळ सेवा भरती अंतर्गत स्पर्धा परिक्षेत उत्तीर्ण झाले. त्यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने पशुधन विकास अधिकारी गट अ या पदावर त्यांची नियुक्ती केली आहे.

डॉ. नितीन अडबलवार यांची पशुधन विकास अधिकारी म्हणून निवड झाल्याबद्दल अउदा (संवसु) बीड विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. अे. एन. रोडे, अति. कार्यकारी अभियंता श्री. आर. ए. नायगांवकर, व उपकार्यकारी अभियंता श्री. एस. पी. पाठक , श्री. आकरे प्रमोद उच्चस्तर लिपीक (मासं) आदीनी अभिनंदन केले. डॉ. नितीन अडबलवार यांच्या यशाबद्दल त्यांचे महापारेषण परिवारा तर्फे हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा.

# Good Parenting

बरेच वेळा पालक आपल्या पाल्याबद्दल तक्रारी दर्शवताना आपण पाहतो. प्राथमिक, माध्यमिक महाविद्यालय, असा विद्यार्थी दशेचा प्रवास सर्व पाल्यांना करायचा असतो. सर्वाचा एकच ध्यास माझा पाल्य अभ्यासात अव्वल असला पाहिजे, नाही तर पालक व्यथीत झालेले आपण पाहतो. परंतु हा निकष कितपत योग्य आहे. पाल्याचा विकास / यश ह्याचा अभ्यासातील अव्वल गुणांशी थेट संबंध असतो व नसतोही. त्यामुळे पाल्य अभ्यासात अव्वल नाही यांचा संताप करून घेवून हार मानणे योग्य नाही.

'पुत्र व्हावा ऐसा गुंडा ज्याचा तिन्ही लोकी झेंडा' असे ह्या करीता म्हटले जाते की पाल्यांना यशस्वी होणे महत्वाचे आहे. त्याकरीता शैक्षणिक कामगिरी एक साधन आहे. अभ्यास साधना आणि डॉक्टर / इंजिनीयर / अधिकारी होणे साध्य होय. मात्र हे साधन, साधना व साध्य अनेक आहेत. ह्याचा आपणास विसर पडतो. Competent होण्याकरीता Knowledge, Skill आणि Attitude ह्यांची गरज असते हे आपल्या सर्वांना माहिती आहे. मात्र आजच्या आधुनिक युगात त्यापैकी Skill आणि Attitude ह्याला अधिक महत्व प्राप्त आहे. Education कोणालाही ठराविक दिवसाच्या कालावधीत मिळवता येते व त्यामुळे फक्त Education ह्या बाबींवर कोणालाही Replace करता येत. मात्र Skill व Attitude ह्या बाबी Uniqueness व Speciality / Expretise निर्माण करतात व त्या सहजासहजी Replace करता येत नाहीत.



त्यामुळे शैक्षणिक कामगिरी जेमतेम असली तरी पाल्य उचित Skill व Attitude च्या बळावर चांगली शैक्षणिक कामगिरी असलेल्या मुलांच्याही पुढे गेलेले आपण पाहतो. त्याकरीता मुलांचा कल ओळखा त्यांच्या सुप्त गुणांना वाव द्या. त्यांचा सर्वांगिण विकास होईल यावर लक्ष द्या. त्यांच्याबरोबर सतत Dialogue करून आपण आपले अनुभव Share करा. त्यांना आज्ञा देवू नका. त्यांना Perspective सांगा व त्यांना ठरवू द्या. In short त्यांना Instruct न करता त्यांना Facilitate करा. ह्या गोष्टी दुसऱ्याच्या अंगावर टाकून तुम्ही जबाबदारी पार पाडता आहात, ह्या भ्रमात राहू नका. स्वत: मेल्या शिवाय स्वर्ग दिसत नाही. "A child gives Birth to a mother", त्यामुळे तुम्हाला पुन्हा त्या Phase मधून जायचे आहे. (म्हणजेच प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालय.)

शालेय यश अपेक्षित असेल तर तुम्हाला परत विद्यार्थी दशेतून जावे लागेल. स्वत: Exemplary राहाल तरच ते गुणधर्म आपल्या पाल्यामध्ये येतील. कारण ते अनुकरण करत असतात. त्यांना शक्यतोवर चांगल्या वातावरणात ठेवा. सतत परिस्थितीची जाणीव करून द्या, प्रेरणा द्या, प्रोत्साहन द्या. मात्र नाहक लाड करू नका. त्यांचा Social Factor / Emotional Quotient विकास होईल ह्या करीता जाणीवपूर्वक प्रयत्न करा. त्यांच्या चांगल्या / वाईट गोष्टींचा अभ्यास करा. चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन द्या व वाईट गोष्टी दूर होतील ह्याकरीता नियोजन बध्द रितीने प्रयत्न करा. त्यांना Protect करण्याच्या उद्देशात त्यांचे Freedom हरवून टाकू नका. त्यांना Over Protect करून त्यांचा नैसर्गीक विकास खुंटवू नका.

सर्वच पाल्य ९०% च्या पुढे येणार नाहीत. काहीजण येतील व बरेच जन मागे राहतील. म्हणूनच काहीजण पुढे जाऊ शकतात. ऊन आहे म्हणून सावलीचे महत्व आहे. दु:ख आहे म्हणून सुखाचा आनंद समजतो. अंधार आहे म्हणून प्रकाशाचे अस्तित्व आहे. हार आहे म्हणून जीत आहे. दुसऱ्या अंगाने त्या हार मध्येच जीत असते. सोन्याला घडविण्यासाठी त्यास भट्टीमधून जावं लागत. सोनं सोनं असतं. त्यावर माती टाकली तरी त्याचे मोल कमी होत नाही.

आलेल्या संधीचं सोनं करण्याची सवय पाल्याला लावा कारण Output is product of right Process. चांगली Process चांगला Output घडवत असतो. तुमच्या पाल्याला चांगल्या Process मध्ये टाका Automatic चांगला Output मिळेल.

Happy Parenting !

**From the Desk of ED (HR)**

## कामगिरीचे नियोजन वर्ष २०१५ - २०१६

वेतनगट १ व २ करीता कंपनीने वर्ष २०१०-२०११ पासून नवीन कार्यमुल्यांकन पद्धत कार्यान्वीत केली तद्नुसार नवीन वित्तीय वर्ष सुरू होतास प्रत्येक अभियंता व अधिकारी यांनी आपले त्या वर्षाकरीता कामगिरीचे लक्षे आपल्या वरीष्ट अधिकारी यांच्या कडून ठरवून घेणे गरजेचे राहते व त्या लक्षानुरूप त्यांच्या कामगिरीचे मुल्यांकन (Mid Year आणि End Year) ला केले जाते.

ह्या मुल्यांकन पद्धतीचा केंद्रबिंदू कामगिरीचे नियोजन (Performance Planing) आहे व त्यामुळे ते नियोजीत वेळेत पार पाडणे गरजेचे आहे.

ह्या संदर्भात काही शंका किंवा सुचना असतील तर कार्यमुल्यांकन कक्ष, मुख्य कार्यालय, मुंबई यांच्याशी संपर्क साधावा.

**वरिष्ठ व्यवस्थापक (मा. सं.)**

कार्यमुल्यांकन कक्ष, मुख्य कार्यालय, मुंबई

संपादक : श्री.संदीप नरडेले, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं. सी. - १९, ई. ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by PRO Shri. Sandeep Nardele For Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,
Printed at Hema Arts : 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka,
W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai - 400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra Kurla Complex, Mumbai - 400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.